नं. ७६

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
किरकोळ
७६

संग्रहालय क्रमांक
७६

लेखक जगदीश्वर
प्रिंटिंग प्रेस-मुंबई

७८८

पुस्तकाचें नांव मुंबईतील व्यापारी व सावकारांनी
संबंधीत महत्वाची संस्थांना संदर्भ
सोयीस्कर
डॉ. महाराष्ट्रीयपत्रिका

# श्रीमहाकालीप्रसन्न.

## मुंबईतील त्वष्टाकांसारज्ञातीसंबंधीं
व
## श्रीमहाकालीसंस्थानसंबंधीं
# नियम.



हें पुस्तक.

मुंबईत जगदीश्वर छापखान्यांत छापिलें.
मिती मार्गशीर्ष शुद्ध १५ शके १८१०, तारिख १८
माहे डिसेंबर सन १८८८ इसवी.

# श्रीमहाकालीप्रसन्न.

## मुंबईंतील त्वष्टाकांसार ज्ञातीसंबंधीं.

व

## श्रीमहाकाली संस्थानसंबंधीं नियम.



हें पुस्तक.

मुंबईंत जगदीश्वर छापखान्यांत छापिलें.

मिती मार्गशीर्ष शुद्ध १५ शके १८१०. तारीख १८

माहेडिसेंबर सन १८८८ इसवी.

# श्रीमहाकाली प्रसन्न.

तारीख ११ माहे सप्टेंबर सन १८८८ रोजीं पायधुणी वरील श्रीमहाकालीचे देवालयांत मुंबईतील त्वष्टा कांसार ज्ञातीची सभा भरली होती, तेवेळीं सभेचे जे ठराव झाले, त्यापैकीं ५ वा ठराव पुढें दिल्याप्रमाणें आहे.

" ज्ञातिनियमाचे पुस्तकांमध्यें फेरबदल करण्याचें काम रा० रा० आनंदराव वामन शेटे यांजकडे नेमिलें आहे; त्यांहीं नियमाचा खर्डा करून निवडक मंडळीपुढें सादर करावा, त्या निवडक मंडळींतील गृहस्थांचीं नांवें येणेंप्रमाणें.

| | |
|---|---|
| रा. रा. शंकर दामोदर गोडांबे. | रा. रा. अनंत बचाबा त्रिभुवने. |
| रा. रा. पुरुषोत्तम बंडूजी हजारे. | रा. रा. तुकाराम दामोदर शिंगरी. |
| रा. रा. बाळकृष्ण भाऊ गोडांबे. | रा. रा. शंकर राघोबा रात. |
| रा. रा. नंदराम भिवराव दांडेकर. | रा. रा. विष्णु गोविंद अर्थे. |

रा. रा. रामकृष्ण गोविंद अर्थे.

नंतर निवडक " कमिटीनें " ते नियम तपासून त्यांजवर विचार करून ते जितकी त्वरा होईल तितकी करून ज्ञातिसभेपुढें ठेवण्याकरितां चिटणिसास सुचना करावी व चिटणिसानीं त्या नियमाचे पहिले वाचनाकरितां ते त्वरित ज्ञातिसभेपुढें आणावे. "

ह्या ठरावाबरहुकूम नियमाचा खर्डा तयार होऊन निवडक मंडळीनें तपासल्यानंतर ज्ञातिसभेपुढें त्याचें पहिलें वाचन तारीख १६ माहे डिसेंबर सन १८८८ रोजीं झालें व त्याचें दुसरें व शेवटचें वाचन ज्ञातिसभेपुढें मार्गशीर्ष शुद्ध १४ शके १८१० सोमवार तारीख १७

माहे डिसेंबर सन १८८८ रोजीं झालें. ते सर्व नियम ज्ञातिसभेनें पसंत करून असा ठराव केला कीं हे नियम ज्ञातीच्या माहितीकरितां छापून प्रसिद्ध करावे. त्या ठरावान्वयें हे नियम मीं छापून प्रसिद्ध केले आहेत.

मुंबई मिती मार्गशीर्ष
शुद्ध १५ शके १८१०
तारीख १८ माहे डिसेंबर
सन १८८८.

रामकृष्ण पुरुषोत्तम,
चिटणीस.

# श्रीमहाकालीप्रसन्न.

## मुंबईंतील त्वष्टा कांसार ज्ञातीसंबंधीं
व
## श्रीमहाकाली संस्थानसंबंधीं नियम.

## अनुक्रमणिका.

पृष्ठ.

प्रकरण १ लें.

अर्थ ........................................ १

प्रकरण २ रें.

सभेची रचना ........................................ १

प्रकरण ३ रें.

पंचांचे अधिकार ........................................ २

प्रकरण ४ थें.

चिटणिसाचीं कामें ........................................ ३

प्रकरण ५ वें.

वसूलदाराचीं कामें ........................................ ५

प्रकरण ६ वें.

खजानिसाचीं कामें ........................................ ५

प्रकरण ७ वें.

संस्थानाच्या पैशाचा उपयोग ........................................ ६

प्रकरण ८ वें.

सर्व साधारण नियम ........................................ ६

# श्रीमहाकाली प्रसन्न.

## मुंबईतील त्वष्टाकांसार ज्ञातीसंबंधीं व श्रीमहाकाली संस्थानसंबंधीं नियम.

### प्रकरण १ लें.

अर्थ.

१ ज्ञात--ह्मणजे, माजगांव व मुंबई-माहिम खेरीज करून मुंबईशहरांत रहाणारे त्वष्टा कांसार.

### प्रकरण २ रें.

सभेची रचना.

२. ज्ञातीमध्यें संस्थानाची व्यवस्था राखण्याकरितां एक व्यवस्थापक मंडळी असावी. तींत सभासदांची संख्या ३५ असावी.

३. ज्ञातीमध्यें पांचपंच, एक चिटणीस, एक खजाननीस व एक वसूलदार असे अधिकारी असावे व त्यांच्या नेमणुका व्यवस्थापक मंडळींतून कराव्या.

४. पंचांची सभा असेल तेवेळीं पंचांपैकीं चार पंच हजर असल्यास सभेचें काम सुरू केलें जाईल.

५. व्यवस्थापक मंडळीची सभा असेल तेवेळीं पंच खेरीज करून व्यवस्थापक मंडळीपैकीं दहा असामी हजर असल्यास सभेचें काम सुरूं केलें जाईल.

६. ज्ञातीची सभा असेल तेवेळीं पंच खेरीज करून वीस ज्ञाती गृहस्थ हजर असल्यास सभेचें काम सुरू केलें जाईल.

७. वर लिहिलेले नियम ४-५ व ६ या बरहुकूम ज्या सभा होतील त्या सभेचे ठराव गैरहजर असलेले पंच, व्यवस्थापक आणि ज्ञातिगृहस्थ यांस मान्य होतील.

८. वर लिहिलेले नियम ४-५ व ६ या बरहुकूम जेव्हां जेव्हां सभा होतील तेव्हां तेव्हां प्रत्येक सभासदानें विषयास अनुसरून जें

कांहीं बोलणें असेल तें अध्यक्षास अनुलक्षून बोलावें व विषयांतर करूं नये आणि कोणाही सभासदाच्या मनास लागेल अशा वर्मी भाषणाचा उपयोग करूंनये. जो कोणी अशा भाषणाचा उपयोग करील त्यास ती सभा शिक्षा करण्यास मुखत्यार आहे.

९. सभेंत कोणाचेंही भाषण पाल्हाळीक, असंबद्ध किंवा विषया बाहेर असल्यास तें बंद करण्याचा अधिकार अध्यक्षास आहे.

१०. वर लिहिलेले नियम ४–५ व ६ याबरहुकूम सभा होतील त्या वेळीं नेमलेल्या विषयांचाच विचार करण्यांत येईल.

११. नियम ४–५ व ६ या बरहुकूम ज्या सभा होतील त्या त्या सभेच्या अध्यक्षाच्या हुकुमानें चालतील.

१२. नियम ४–५ व ६ या बरहुकूम सभा होऊन ज्या विषयांचा उलगडा केला जाईल त्या विषयींचा ठराव ठरावपुस्तकांमध्यें लिहिला जाईल.

१३. व्यवस्थापकमंडळीची नेमणूक ज्ञातीनें बहुमतें करावी. आणि पंच, चिटणीस, खजाननीस व वसूलदार या सर्वांच्या नेमणुका व्यवस्थापकमंडळीनें आपल्या मंडळीपैकीं बहुमतें कराव्या.

१४. व्यवस्थापक, पंच, चिटणीस, खजाननीस व वसूलदार या सर्वांच्या नेमणुका एक वर्षपर्यंत चालतील; परंतु बहुमतें ठरल्यास त्यांच्याच नेमणुका पुढील वर्षासाठींही केल्या जातील.

१५. संस्थानसंबंधीं वर्ष चैत्र शुद्ध १ पासून तों फाल्गुन वद्य ३० पर्यंत धरिलें जाईल.

१६. साल अखेर होण्यापूर्वी प्रत्येक वर्षाच्या फाल्गुन महिन्याच्या पहिले आठवड्यांत पुढील सालाकरितां सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्याजातील. व त्यासंबंधीं सूचना त्या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्यें ज्ञातीस दिली जाईल.

## प्रकरण ३ रें.

### पंचांचे अधिकार.

१७. संस्थानसंबंधीं जे खर्च ज्ञातिनियमामध्यें बांधले गेले नसतील त्यासंबंधीं जरूर लागल्यास रुपये १०० पर्यंत खर्च करण्याची मंजरी

देण्याचा अधिकार पंचाचे सभेस आहे. परंतु त्यापेक्षा अधिक खर्च करण्याची जरूरी लागल्यास रु० ३०० पर्यंतची मंजूरी व्यवस्थापकमंडळीच्या सभेकडून घेतली पाहिजे. व त्याहींपेक्षां अधिक खर्च करण्याची जरूरी लागल्यास ज्ञातिसभेची मंजूरी घेतली पाहिजे.

१८. नियमामध्यें दिलेले व मंजूर झालेले दुसरे खर्च चिटणीस व्यवस्थीत रीतीनें करितो किंवा नाहीं व खजाननीस व वसूलदार हे आपापलीं कामें योग्य रीतीनें करितात किंवा नाहीं हें पाहण्याचें काम पंचांचें आहे.

१९. जर पंचांस, चिटणीस, खजाननीस, व वसूलदार यांची किंवा त्यांपैकीं एखाद्याची त्याचे कामांत हयगय दिसून आली तर त्यांहीं (पंचांहीं) लागलीच व्यवस्थापकमंडळीची सभा भरून त्याची कागाळी करावी. व आपल्या कागाळीचे लेखी मुद्दे आरोपीत यास पाठवावे. नंतर व्यवस्थापकमंडळीच्या सभेनें त्याचा विचार करून दोषी ठरलेल्या अधिकाऱ्यास शिक्षा करावी.

२०. नेमलेले वार्षिक उत्साह इत्यादिकांत देखरेख करण्याकरितां पंचांनीं चिटणिसास मदत करावी.

## प्रकरण ४ थें.

### चिटणीसाचीं कामें.

२१. संस्थानसंबंधीं सर्व कागदपत्रें [ दफ्तर ] श्रीचे देवालयांतील संस्थानचे कचेरींत ठेवावीं व त्याची किल्ली चिटणिसानें आपल्या जवळ ठेवावी.

२२. चिटणिसास सभेसंबंधीं पत्रें येतील तीं त्यानें ज्या ज्या सभेला तीं पत्रें लागू असतील त्या त्या सभेपुढें ठेवावीं, व सभेच्या ठरावाप्रमाणें वागावें.

२३. चिटणिसानें संस्थानसंबंधीं सर्व हिशोब ठेवावे व पंचांच्या व्यवस्थापकांच्या अथवा ज्ञातीच्या सभेनें जो पैका ज्या कामीं खर्च करण्याकारितां मंजूर केला असेल, तो त्या कामाकरितां व्यवस्थित रीतीनें खर्चावा.

२४. वसूलदारानें संस्थानसंबंधीं जो पैका वसूल केला असेल तो चिटणिसानें आपल्या स्वाधीन घेऊन त्याची पावती वसूलदारास द्यावी.

२५. चिटणिसानें वसूलदारा जवळून आलेला वसूल व देणगीच्या

रूपानें वगैरे कोणत्याही प्रकारें आलेला पैका हा सर्व, आपले जवळ किरकोळ खर्चाकरितां १०० रुपये ठेवून, खजाननिसाच्या स्वाधीन करून त्याची पावती घ्यावी व खजाननिसानें तो ब्यांकेंत ठेवावा.

२६. चिटणिसानें संस्थानाचा पुजारी, कारकून, शिपाई व इतर गडी माणसें व नोकर आपल्या अमलाखालीं ठेवावे व त्यांपैकीं कोणी गैरशिस्त रीतीनें वागल्यास अथवा आपल्या वाजवी हुकुमाचा अनादर केल्यास त्यास तूर्त कामावरून बंद करून त्याची पंचांस फिर्याद करावी व पंचांच्या सभेनें त्यासंबंधीं चौकशी करून दोषी ठरलेल्या मनुष्यास त्याच्या अपराधाप्रमाणें त्यांच्या नजरेस येईल ती शिक्षा करावी

२७. चिटणिसानें संस्थानचे नोकरांच्या पगाराची यादी दर महिन्यास ठरल्या दराप्रमाणें करून ती खजिनदाराकडे त्याच्या सही करितां पाठवावी व त्यावर खजिनदाराची सही झाल्या नंतर त्या कामगारांच्या त्या पगाराच्या यादीवर सह्या घेऊन त्यांस पगार द्यावे.

२८. वर्ष पुरें झाल्या नंतर हिशोबाची तपासणी करणारे जे नेमले जातील त्यांस चिटणिसानें हिशोब तपासण्याचे कामीं जी मदत लागेल ती व ज्या कागदपत्रांची गरज लागेल तीं द्यावीं.

२९. चिटणिसानें संस्थानसंबंधीं कचेरी श्रीमहाकालीचे देवालयांत भरावी व संस्थानचें दफ्तर चांगल्या रीतीनें ठेवावें.

३०. संस्थानसंबंधीं पुजारी, कारकून व दुसरे नोकर नेमणें हें चिटणिसाचें काम आहे. नेमलेला पुजारी व कारकून हे हुशार असून विश्वासू व सचोटीचे असले पाहिजेत व त्यांस पगार व्यवस्थापकमंडळी ठरवील त्याप्रमाणें द्यावे.

३१. श्रीचे सोन्या रुप्याचे व मोत्यांदिकांचे सर्व दागिनें देवळामध्यें तिजोरींत ठेवावे व उंची वस्त्रेंप्रावर्णें देवळामध्यें कपाट अथवा पेटींत जपून ठेवावीं.

३२. श्रीच्या देवळामध्यें संस्थानसंबंधीं सामानाचे देखरेखीचें जोखीम चिटणिसानें संस्थानसंबंधीं नेमलेल्या नोकर लोकांवर सोंपावें व कोणत्याही जिनसेची तसनस झाली असतां योग्य तपास करून पंचांस त्याची फिर्याद करावी.

३३. एखाद्या संस्थानाच्या कामगारा जवळून जामीन घेण्याचें चिटणिसास जरूर वाटल्यास त्यानें त्याचा जामीन घ्यावा.

३४. चिटणिसानें वसूलदारास पैका वसूल करण्याच्या व हिशोब ठेवण्याच्या कामीं व त्याचप्रमाणें खजाननिसास हिशोब ठेवण्याच्या व ब्यांकेंत पैसा भरण्याच्या वगैरे कामीं संस्थानाच्या कारकुनाची व शिपायाची मदत द्यावी.

३५. चिटणिसानें वसूलदाराकडून वसूल आपल्या स्वाधीन वेळच्यावेळेवर करून घेण्याविषयीं तजवीज ठेवावी.

## प्रकरण ५ वें.

### वसूलदाराचीं कामें.

३६. वसूलदारानें संस्थान वगैरे संबंधीं वसूल करून तो त्वरित अथवा दोन दिवसांचे आंत चिटणिसाचे स्वाधीन करावा व चिटणिसाजवळून आपण दिलेल्या पैशाची पावती पावतीबुकांत घ्यावी.

३७. संस्थान वगैरे संबंधीं वसूल येण्याच्या कामीं कांहीं हरकती आल्यास वसूलदारानें कायदेशीर उपाय योजून वसूल करून घ्यावा.

३८. वसूलदारानें आपण वसूल केलेल्या पैक्याची नोंद आपल्या सहीनिशीं संस्थानाच्या पुस्तकांत वेळच्यावेळीं करावी.

## प्रकरण ६ वें.

### खजाननिसाचीं कामें.

३९. खजाननिसानें चिटणिसाकडून जो पैका येईल तो आपल्या स्वाधीन घ्यावा. व तो त्वरित मुंबईब्यांकमध्यें **त्वष्टाकांसार श्री महाकालीफंड** या नांवानें जमा करावा व जमाकेल्याचा दाखला चिटणिसाकडे नोंदवावा.

४०. ज्याज्या वेळीं चिटणीस मंजूर झालेल्या कामाकारितां पैका मागेल त्यात्या वेळीं तो त्यास देण्याविषयीं खजाननिसानें तजविज करावी.

४१. ब्यांकेंत ठेवलेल्या पैशापैकीं मंजूर झालेल्या रकमा मंजूर झालेल्या कामाकारितां चिटणीस, खजाननीस व वसूलदार या तिघांच्या सह्यांनीं खजाननिसानें काढाव्या.

४२. चिटणिसाकडून वेळच्या वेळीं आपल्याकडे पैका न आल्यास त्याविषयीं खजाननिसानें चौकशी करावी. व चिटणिसाकडून योग्य माहिती न मिळाल्यास पंचांस अविलंबें त्याची कागाळी करावी

## प्रकरण ७ वें.

### संस्थानाच्या पैशाचा उपयोग.

४३. संस्थानाच्या पैशाचा उपयोग संस्थानसंबंधीं सरकारी कर देण्याच्या कामीं केला जाईल.

४४. श्री महाकालीच्या दररोजच्या व नेमलेल्या पुजा अर्चा व वार्षिक उत्साह इत्यादिकांकडे संस्थानाच्या पैशाचा उपयोग केला जाईल.

४५. संस्थानसंबंधीं स्थावर जंगम मिळकतीच्या संरक्षणार्थ व दागदुजींत, त्याचप्रमाणें स्थावर जंगम मिळकत विकत घेण्यांत ह्या पैशाचा उपयोग केला जाईल.

४६. ज्ञातीमध्यें कोणी अती गरीब असून त्याचे घरीं मयत झालें असतां त्यास त्या मयताचा अंत्यष्टी संस्कार करण्याची ऐपत नसली तर त्यास ह्या पैशांतून मदत रुपये १५ मिळेल. ह्या मदतीसाठीं त्यानें चिटणिसाजवळ मागणी करावी, व चिटणिसानें सदरहू बद्दल आपली खात्री करून घेऊन मदत द्यावी.

४७. ज्ञातीमध्यें गरीब मुलांच्या शिक्षणार्थ संस्थानच्या पैशांतून मदत करावी व श्रीमहाकालीचे देवालयांत एक रात्रीची व एक दिवसाची अशा दोन शाळा पाहिजे असल्यास घालाव्या. दिवसाच्या शाळेंत व्यवहारीक ज्ञानाचें शिक्षण द्यावें. व रात्रीचे शाळेंत धर्मसंबंधीं शिक्षण द्यावें व अशा रात्रीच्या शाळेस "वेदपाठशाळा" असें नांव द्यावें.

४८. ज्ञातीमध्यें जे कोणी निराश्रित, वृद्ध, अपंग असून ज्यांस कोणतेंही उपजीविकार्थ काम करण्याची शक्ति नसेल त्यांस व त्याच प्रमाणें ज्या कोणी निराश्रित विधवा स्त्रिया असतील त्यांस ह्या फंडांतून मदत केली जाईल.

४९. ज्ञातींतील गरीब लोकांच्या संरक्षणार्थ धंद्याची गरज लागल्यास ह्या फंडांतून एक कारखाना योग्य दिसल्यास काढावा. ह्या कारखान्याची व्यवस्था व्यवस्थापकमंडळीच्या नजरेस येईल त्या रीतीनें करावी.

## प्रकरण ८ वें.

### सर्व साधारण नियम.

५०. पायधुणी वरील श्रीमहाकालीच्या देवळाच्या चाळीचें, कां-

देवाडींतील चाळींचें व संस्थानाच्या इतर मिळकतींचें भाडें वसूलदारानें घेऊन नियमाप्रमाणें त्याची व्यवस्था करावी.

५१. पेढीवाले ह्मणजे तांबें, पितळ, व इतर धातूंचीं भांडीं विकणारे व्यापारी यांस ज्ञातीचे गृहस्थ माल ( तांब्या पितळेचीं वगैरे भांडीं ) करून देतात त्यांचे मजुरीपैकीं वहिवाटीप्रमाणें धर्मादाय दर रुपयास दोन पै व पेढीवाल्यांकडून दोन पै मिळून चार पै वसूलदारानें वसूल करावा.

५२. बोहरी, खोजे व मारवाडी पेढीवाले ( तांब्या पितळेचीं वगैरे भांडीं विकणारे दुकानदार ) ज्यांस ज्ञातिगृहस्थ माल करून देतात त्यांकडून वहिवाटीप्रमाणें दर मणास एक आणा याप्रमाणें वसूलदारानें वसूल करावा. हा दर व्यवस्थापक मंडळीच्या विचारानें कारण पडल्यास कमजास्त करावा.

५३. बाजारांतील दुकानदारांपैकीं वारा विकण्याचा अधिकार एका दुकानदारास द्यावा व त्या संबंधानें जें कांहीं उत्पन्न होईल तें वसूलदारानें वसूल करावें.

५४. ज्ञातींत जीं मंगलकार्यें होतात त्यांवर धर्मादाय ज्ञातीचा हक्क परंपरा चालत आला आहे. तो असा कीं लग्नसंबंधीं वराकडून रुपये तीन व वधूकडून रुपया एक, तसेंच उपनयन ह्मणजे मुंजीसंबंधीं रुपया एक व गर्भाधान संबंधीं रुपया १. हा हक्क ज्या गृहस्थाकडे वर लिहिलेलीं कार्यें होणार आहेत त्यानें देवळामध्यें वसूलदारास भरून त्याजपासून पावती घ्यावी.

५५. ज्ञातीपैकीं कित्येक दुकानदार फेरीवाले व चांदीचें काम वगैरे धंदा करणारे यांजकडून द्वाही व धर्माचे दिवस न पाळण्याबद्दल जो वहिवाटीप्रमाणें कर आहे, तो वसूलदारानें वसूल करावा.

५६. कोणीही ज्ञातिगृहस्थ ज्ञातिसंबंधीं प्रकरण ज्ञातीसभेपुढें निवाड्यास आणूं इच्छील तर त्यानें त्याजविषयीं चिटणिसाकडे पत्र पाठवावें. चिटणिसानें तें पत्र होईल तितक्या त्वरेनें पंचांच्या सभेपुढें ठेवावें. पंचांनीं त्यावर आपले विचार प्रदर्शित करून तें पत्र व्यवस्थापकमंडळीकडे आपल्या शेऱ्यासहित निकालाकरितां पाठवावें आणि व्यवस्था-

पक मंडळीनें त्या पत्राचा योग्य विचार करून निकाल करावा. व अतिशयच महत्वाचा खटला असल्यास ज्ञातीची सभा मिळवून त्या खटल्याचा निकाल करावा. प्रत्येक प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळीं तंट्यांतील पक्षकारांस सभेंत बोलवावें व त्या प्रकरणाचा योग्य रितीनें निकाल करावा.

५७. पंचांची व व्यवस्थापकांची सभा चिटणिसाचे लेखी आमंत्रणानें भरली जाईल व ज्ञातीची सभा चिटणिसाचे छापील आमंत्रणानें भरली जाईल.

५८. आमंत्रणपत्रकें वांटण्याकरितां चिटणिसानें आपल्या हाताखालील कारकून अथवा दुसरा कोणी संस्थानाचा नोकर व जरूर पडल्यास दुसऱ्या मनुष्याची योजना करावी.

५९. चिटणिसानें गैरवर्तन केल्यास तत्संबंधीं सभा करण्याचा अधिकार पंचांस व व्यस्थापकमंडळीस आहे.

६०. चिटणीस, खजाननीस, वसूलदार व पंच यांजमध्यें कांहीं वाद पडल्यास व्यवस्थापकमंडळीच्या सभेनें त्याचा उलगडा करावा.

६१. वसूलदार, चिटणीस, खजाननीस तसेंच पंचांपैकीं एखादा पंच, व्यवस्थापकमंडळीपैकीं एखादा सभासद गैरवर्तन करून संस्थान अगर ज्ञातीसंबंधीं हरएकप्रकारचें नुकसान करील अथवा पुढें करूं इच्छील अथवा ज्ञातीनें ठरविलेल्या नियमाविरुद्ध वहिवाट करील तर त्याविषयीं योग्य चौकशी करून त्यास त्याच्या अधिकारावरून दूर करण्यास तो पात्र होईल.

६२. चिटणीस, खजाननीस, वसूलदार, पंच व व्यवस्थापकमंडळी ह्यांपैकीं जो कोणी एक वर्षाची मुदत पुरी न होतां मध्येंच आपली जागा सोडूं इच्छील त्यानें एक महिन्याची लेखी सूचना चिटणिसास पाठवावी व चिटणिसानें व्यवस्थापकमंडळीची सभा मिळवून त्यापुढें तो राजीनामा निकालाकरितां ठेवावा.

६३. राजीनामा दिलेल्या अथवा ज्ञातिनियमाप्रमाणें काढलेल्या अधिकाऱ्याच्या जागेवर दुसऱ्याची नेमणूक करण्याविषयीं चिटणिसानें विलंब न लावितां तजवीज करावी.

६४. श्रीदेवीचे संस्थानावर मुंबईंतील त्वष्टाकांसार ज्ञातीचा सर्वप्रकारें हक्क आहे व वंशपरंपरा या संस्थानाची वहिवाट याच ज्ञातीचे हातून चालविण्याचा हक्क आहे परंतु तो हक्क नियमाप्रमाणें फंडाचा चांगला उपयोग करण्यापुरता आहे. संस्थानाची स्थावर मिळकत विकण्यास किंवा दान देण्यास अथवा बक्षिस देण्यास अगर गहाण ठेवण्यास कोणाही ज्ञातिगृहस्थास अधिकार नाहीं.

६५. चिटणिसानें दरवर्षी चैत्रमहिन्यांत संस्थानच्या संबंधानें ज्या ज्या गोष्टी झाल्या असतील त्या व उत्पन्न व खर्च वगैरेचा लेखी रिपोर्ट पंचांपुढें आणावा व पंचांनीं तो रिपोर्ट तपासून व्यवस्थापकमंडळीपुढें ठेवावा. व्यवस्थापकमंडळीनें तो पसार केल्यावर ज्ञातीसभेपुढें ठेवून ज्ञातीच्या मंजुरीनें चिटणिसानें छापून प्रसिद्ध करावा.

६६. व्यवस्थापक मंडळीनें हिशोबाची तपासणी करण्याकरितां दोन गृहस्थांची नेमणूक करावी. व त्या दोन गृहस्थांनीं हिशोब तपासून आपल्या सहीनिशीं दाखला द्यावा. तो दाखला ज्ञातीस मान्य होईल.

६७. चिटणीस, खजाननीस व वसूलदार यांहीं हिसाबनिसाला हिशोब तपासण्यासाठीं जीं जीं साधनें लागतील तीं तीं अविलंबें द्यावीं.

६८. नियमाप्रमाणें संस्थान संबंधीं वार्षिक नेमलेल्या खर्चाची यादी.

| | रु० पर्यंत |
|---|---|
| चैत्र शु० १ पासून तों रामनवमी पर्यंत | ७५–,, |
| वैशाख शु० १५ श्रीचे यात्रेसंबंधीं | २५०–,, |
| आषाढ वद्य ३० संबंधीं | २०–,, |
| श्रावण शु० १५ श्रावण्यासंबंधीं | २५–,, |
| अश्वीन शु० १ पदे पासून विजयादशमीपर्यंत | १००–,, |
| दिपवाळींत श्रीचेदेवळास रंग व दीपोत्साह वगैरे | ४०–,, |
| कार्तीक शु० १५ ( त्रिपुरी पौर्णिमा ) संबंधीं | १०–,, |
| माघ शु० ५ ( वसंत पंचमी ) संबंधीं | १०–,, |
| फाल्गुन शु० १२ रंग व अबीराबद्दल | १००–,, |
| फाल्गुन वद्य ३० संबंधीं | १०–,, |
| श्रीच्या पूजेसंबंधीं पुष्पादिकांचा एकंदर बारा महिन्यांचा खर्च | ६०–,, |

श्रीच्या नंदादीपास वगैरे तेलासंबंधीं बारा महिन्याचा खर्च.... ४०–,,
श्रीच्या नैवेद्यासंबंधीं बारा महिन्यांचा खर्च.................. १२०–,,
श्रीच्या उत्साहासंबंधीं ब्राह्मणभोजन ............................३०–,,

एकंदर रु० ८९०

६९. संस्थानसंबंधीं नेमलेल्या खर्चाखेरीज दुसरे खर्च करण्याविषयीं मंजुरी देणें ती संस्थानाचे कनिष्ट १,००० रुपये तरी शिल्लक ठेवून द्यावी व संस्थानावर कोणत्याही रीतीनें कर्जाचा बोजा घालूं नये ह्मणजे संस्थानावर कर्ज काढूं नये.

७०. संस्थानाच्या किंवा ज्ञातीच्या संबंधानें पत्रव्यवहार चिटणिसाबरोबर करावा व चिटणिसानें त्याची व्यवस्था नियमाप्रमाणें करावी.

७१. जर कोणी ज्ञातीगृहस्थास ज्ञातीसभेनें अथवा दुसऱ्या सभांनीं केलेल्या ठरावाची नक्कल पाहिजे असल्यास त्यानें चिटणिसाजवळ मागणी करावी व चिटणिसानें पंचांच्या हुकुमानें त्या ठरावाची नक्कल त्यास द्यावी.

७२. संस्थानाच्या व्यवस्थेमध्यें फक्त मुंबईत राहणाऱ्या त्वष्टा कांसारज्ञाती गृहस्थांचाच हक्क आहे; माजगांव, मुंबई–माहीम व इतर गांवचे राहणारे त्वष्टाकांसार ज्ञातीगृहस्थांचा कोणत्याही रीतीनें हक्क नाहीं.

७३. चिटणीस, खजाननीस व वसूलदार यांहीं आपआपलीं कामें दक्षतेनें व सचोटीनें करावीं. एकमेकांच्या कारभारांत विनाकारण हात घालूं नये.

७४. कोणाच्या मनांत कांहीं बोलावयाचें असून त्यास आपले विचार प्रदर्शित करण्याची शक्ति नसली तर तें काम त्यानें दुसऱ्यावर सोंपावें.

७५. अपराधाप्रमाणें बहिष्कृत करणें, द्रव्य दंड घेणें, क्षौर प्रायश्चित्त करविणें, पंचगव्य घेवविणें, ज्ञातीस नमस्कार घालविणें, ज्ञाती जवळ क्षमा मागविणें व इतर दंड करण्याचा ज्ञातीसभेस अधिकार आहे.

**७६ हे नियम तारीख १ माहे जानेवारी सन १८८९ मार्गशीर्ष वद्य ३० शके १८१० पासून अमलांत येतील.**